RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

Email- jansanchlan@gmail.com    Mob- 9822720784




संपादक : जितेंद्र कायस्थ    वर्ष ३ रे    अंक : २९२ वा    मंगळवार दि १६ डिसेंबर २०२५    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये

# उपजिल्हाधिकारी सिद्धार्थ भंडारेवर पदाचा गैरवापर केल्याचा दिलेल्या पत्रात गंभीर आरोप

## पीडित राहुल तारेंची महसूलमंत्र्यांकडे धाव; महसूलमंत्री बावनकुळे काय भूमिका घेणार?

(भाग ६)

**जनसंचलन/बुलढाणा :** डोंगरखंडाळा येथील गट नंबर १७५ मधील ११.३१ आर सामायिक शेतीवरून मोठा भू-विवाद चिघळला असून या प्रकरणात आता थेट पुणे येथील उपजिल्हाधिकारी व मंत्रालयातील ओ.एस.डी. सिद्धार्थ भंडारे यांच्यावर पदाचा दुरुपयोग केल्याचा थेट आरोप करण्यात आला आहे. पीडित राहुल मिननाथ तारे यांनी महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना दिलेल्या तक्रारीत धक्कादायक बाबी उघड केल्या आहेत.राहुल तारे यांनी सांगितले की,त्यांच्या कुटुंबाची सामायिक जमीन अनेक दशकांपासून त्यांच्या ताब्यात असून दिवंगत वडील मिनानाथ तारे हे आणीबाणी काळातील लोकतंत्र सेनानी होते.




जमीन अद्याप सामायिकच असून सर्व वारसदारांची नोंदही सातबारावर झालेली नाही.शिवाय सदर मालमत्ता ग्रामसेवा सहकारी सोसायटी येथे तारण आहे.याच जमिनीबाबत न्यायालयात लिज पेन्डन्सी क्रमांक ४३३९/२०२३ दाखल असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

अशा परिस्थितीत प्रतिवादी असलेले उपजिल्हाधिकारी सिद्धार्थ भंडारे यांनी कथितपणे बुलडाणा दुय्यम निबंधक यांच्याशी संगनमत करून मावसभाऊ महेंद्र नारायण राऊत यांच्या नावावर बेकायदेशीर खरेदीदस्त तयार करून नोंदणी घडवून आणल्याचा आरोप दिलेल्या पत्रात करण्यात आला आहे.हरकती असूनही मंडळ अधिकाऱ्यांनी फेरफार केला असल्याचाही दावा करण्यात आला आहे.तारे यांनी महसूल मंत्र्यांकडे केलेल्या निवेदनात हा प्रकार ङ्गसरळसरळ पदाचा दुरुपयोग व संगनमताने केलेली जमीन बळकावण्याची कारवाई असल्याचा आरोप करत संबंधित सर्व अधिकाऱ्यांची चौकशी करून कठोर कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे.तसेच बेकायदेशीर खरेदीदस्त,फेरफार आणि सातबाराची नोंद तत्काळ रद्द करण्यात यावी, असेही नमूद केले आहे.आता महसूल खात्याची भूमिका काय राहणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



या प्रकरणात फेरफार देणारा बहुचर्चित मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे ज्यांची (डी ओपन) चौकशी सुरू असतांना शेकडो तक्रारी आयुक्त,जिल्हाधिकारी कार्यालयात असूनही त्यांनी पुन्हा डोंगर खंडाळा शेती प्रकरणात नियमबाह्य दिलेले फेरफार हे सिद्ध करून दाखविले की महसूल प्रकरणात मीच सर्वश्रेष्ठ असून माझ कोणी काहीच 'वाकड' करू शकत नाही ही तर आयुक्त अमरावती व जिल्हाधिकारी बुलडाणा यांनी टेकाळे प्रकरणात का मौन बाळगले आहे की त्यांच्यावरही राजकीय दबाव आहे हे आम्ही पुढील सत्रात

# प्रतिबंधीत मांजाचा वापर केलात तर थेट कारवाई; पोलीस अधीक्षकांचा इशारा

**जनसंचलन/बुलढाणा :** मकरसंक्रांत सणाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात पुन्हा एकदा प्रतिबंधीत नायलॉन, चायनीज व रसायनयुक्त मांजाचा वापर वाढण्याची शक्यता असून, अशा हानीकारक मांजाविरोधात पोलिस प्रशासन आक्रमक झाले आहे. पोलीस अधीक्षक श्री. निलेश तांबे यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला असून, ङ्गप्रतिबंधीत मांजाचा वापर, विक्री, साठवणूक किंवा वाहतूक करणाऱ्यांवर कोणतीही तडजोड न करता कठोर कारवाई केली जाईल,ङ्घ असे त्यांनी ठणकावून सांगितले आहे.

यापूर्वी नायलॉन व चायनीज मांजामुळे निष्पाप नागरिकांचे गळे चिरले जाणे,





दुचाकीस्वार गंभीर जखमी होणे, तसेच असंख्य पक्षी व प्राण्यांचे बळी जाण्याच्या घटना घडल्या आहेत. तरीही काही विक्रेते व बेफिकीर नागरिक जीवाशी खेळत असल्याचा आरोप पोलिसांकडून करण्यात येत आहे. शासनाने या मांजावर पूर्णतः बंदी घातलेली असतानाही नियम धाब्यावर बसवले जात असल्याने आता पोलिसांचा संयम सुटलेला दिसत आहे.

जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांत विशेष पथके तैनात करण्यात आली असून, प्रतिबंधीत मांजा आढळून आल्यास संबंधितांवर भारतीय न्याय संहितेनुसार कठोर गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. पोलिसांनी नागरिकांनाही जबाबदारीची जाणीव करून देत, माहिती लपवू नका, तत्काळ पोलिसांना कळवा, असे आवाहन केले आहे. सण साजरा करा, पण जीवघेण्या मांजाला थारा देऊ नकाङ्घअन्यथा कारवाई अटळ आहे!

# कुष्ठरुग्ण शोध अभियानात जिल्ह्यात ८३ नवीन कुष्ठरुग्ण आढळले

**जनसंचलन/बुलढाणा :** राज्य शासनाच्या आदेशानुसार व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार बुलढाणा जिल्ह्यात कुष्ठरुग्ण शोध अभियान १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत राबविण्यात आले. या अभियानांतर्गत जिल्ह्यात ८३ नवीन कुष्ठरुग्ण आढळून आले असल्याची माहिती सहाय्यक संचालक आरोग्य सेवा यांनी दिली आहे.

या अभियानांतर्गत १,८३६ प्रशिक्षित तपासणी पथकांची नेमणूक करण्यात आली होती. या अभियान कालावधीत दि. २ डिसेंबर २०२५ पर्यंत जिल्ह्यातील ४,८८,७८५ घरांमधील एकूण २३,३०,०७५ लोकसंख्येची शारीरिक तपासणी करण्यात आली. या सर्वेक्षणाची आरोग्य केंद्र स्तरावर ३६७ पर्यवेक्षकांमार्फत प्रभावी पाहणी करण्यात येत असून या तपासणीत जिल्ह्यात एकूण १४,००६ चट्टयांचे (संशयित) रुग्ण आढळून आले. या सर्व रुग्णांची वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून सखोल तपासणी करण्यात आली. त्यामधून ८३ नवीन कुष्ठरुग्णांचे निदान करून औषधोपचार सुरू करण्यात आले आहे.

या निदान झालेल्या रुग्णांना ६ महिने ते १ वर्षापर्यंत नियमित उपचार घ्यावे लागणार असल्याचे सहाय्यक संचालक डॉ. हरी पवार यांनी सांगितले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते यांच्या मार्गदर्शनाखाली आढळलेल्या सर्व चट्टयांच्या रुग्णांची तपासणी १०० टक्के पूर्ण करण्यात आली असून ८३ नवीन कुष्ठरुग्णांना तात्काळ उपचार सुरू करण्यात आले आहेत.

# वंचित समाज : दशा व दिशा

## (राहुल गांधी यांच्या भाषणावर आधारित समीक्षा लेख)


– डॉ. भारत कऱ्हाड –

दिल्लीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या ङ्कवंचित समाज : दशा व दिशाङ्क या कार्यक्रमात राहुल गांधी यांनी केलेले भाषण हे पारंपरिक राजकीय भाषणाच्या चौकटीत बसणारे नव्हते. या व्याख्यानाचा केंद्रबिंदू सत्ता, योजना किंवा निवडणूक नव्हता, तर समाजातील त्या घटकांचा अनुभव होता, ज्यांना वर्षानुवर्षे ऐकले गेले नाही. दिल्लीतील अनेक वृत्तपत्रांनी या भाषणाची दखल घेतली कारण या भाषणात घोषणा कमी आणि संवाद अधिक होता; आरोप कमी आणि आत्म परीक्षण अधिक होते.

राहुल गांधी यांनी आपल्या भाषणात ङ्कवंचित समाजङ्क ही संकल्पना केवळ एका वर्गापुरती मर्यादित ठेवली नाही. दलित, मागास, आदिवासी आणि इतर उपेक्षित घटकांविषयी बोलताना त्यांनी स्पष्ट केले की वंचितता ही फक्त आर्थिक नसते, ती मानसिक, सामाजिक आणि राजकीयदेखील असते. समाजात अनेक लोक असे आहेत की जे रोज जगत असतात, काम करतात, देशाचा कणा मजबूत करतात; पण निर्णय घेताना, चर्चा करताना किंवा भविष्य ठरवताना त्यांचा आवाज कुठेच ऐकू येत नाही. हीच खरी दशा असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

भाषणाचा एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आवाज ऐकला न जाणे. राहुल गांधी वारंवार सांगतात की वंचित समाजाकडे समस्या आहेतच, पण त्याहून मोठी समस्या म्हणजे त्या समस्यांबद्दल बोलण्याची संधीच मिळत नाही. लोकशाहीत प्रत्येकाला बोलण्याचा अधिकार असतो, असे आपण म्हणतो; पण प्रत्यक्षात अनेक घटकांसाठी हा अधिकार कागदापुरताच मर्यादित राहिला आहे. वृत्तपत्रांतील बातम्यांनुसार, त्यांनी हे स्पष्ट केले की वंचित समाजाचा आवाज दबला जातो तेव्हा लोकशाही कमकुवत होते, कारण लोकशाहीचा आत्मा संवादात असतो, मौनात नाही.

या भाषणात राहुल गांधी यांनी प्रतिनिधित्व आणि भागीदारी या मुद्द्यावर विशेष भर दिला. त्यांनी स्पष्ट केले की केवळ काही व्यक्तींना पदावर बसवणे म्हणजे खरे प्रतिनिधित्व नव्हे. प्रतिनिधित्व म्हणजे निर्णयप्रक्रियेत प्रत्यक्ष सहभाग, सत्ता रचनेत वाटा आणि सामाजिक-सांस्कृतिक संस्थांमध्ये उपस्थिती. दिल्लीतील अनेक पेपरांनी नमूद केलेल्या वृत्तांनुसार, त्यांनी सांगितले की वंचित समाजाला फक्त ङ्कज्यांच्यासाठी निर्णय घेतले जातात अशा भूमिकेतून बाहेर काढून जे निर्णय घेतात अशा भूमिकेत आणणे आवश्यक आहे.



राहुल गांधींच्या भाषणाचा सूर आक्रमक नव्हता, तर संवेदनशील होता. त्यांनी स्वतःच्या अनुभवांचा उल्लेख करत सांगितले की देशभर फिरताना, लोकांशी थेट संवाद साधताना एक गोष्ट सातत्याने जाणवतेङ्क लोकांना कुणीतरी ऐकावे, समजून घ्यावे, एवढीच अपेक्षा असते. समस्या लगेच सुटाव्यात अशी अपेक्षा अनेकांची नसते; पण आपली वेदना, आपला अपमान, आपली घुसमट ऐकून घेतली जावी, ही अपेक्षा मात्र प्रत्येकाची असते. हा अनुभवाधारित दृष्टिकोन दिल्लीतील वृत्तपत्रीय बातम्यांत ठळकपणे नोंदवला गेला आहे.

या व्याख्यानात द्वेषाच्या राजकारणाला नकार देणारा स्पष्ट संदेश होता. राहुल गांधी म्हणाले की समाजात निर्माण होणारा द्वेष सर्वांत आधी वंचित समाजालाच मारक ठरतो. जे आधीच कडेला आहेत, त्यांच्यावर संशय, भीती आणि फूट याचा सर्वाधिक परिणाम होतो. त्यामुळे समाजाला पुढे न्यायचे असेल तर द्वेष वाढवून नाही, तर समजून घेऊन, संवाद साधून पुढे जावे लागेल. हा मुद्दा अनेक दिल्लीस्थित माध्यमांनी त्यांच्या भाषणातील मुख्य आशय म्हणून अधोरेखित केला.

लोकशाहीबद्दल बोलताना राहुल गांधींनी कोणतेही सैद्धांतिक प्रवचन केले नाही, तर लोकशाहीचा मानवी अर्थ मांडला. लोकशाही म्हणजे फक्त मतदानाचा अधिकार नाही, तर सन्मानाने ऐकले जाण्याचा अधिकार आहे, असे त्यांनी सांगितले. वंचित समाजाचा आवाज ऐकला गेला नाही, तर लोकशाही केवळ औपचारिक राहते, असा त्यांचा इशारा होता. दिल्लीतील बातम्यांमधून हे स्पष्ट होते की त्यांनी लोकशाही, संविधान आणि माणूस या तीन गोष्टी एकत्र जोडून मांडल्या.

या कार्यक्रमात राहुल गांधी यांनी संवादाची प्रक्रिया कशी असावी, यावरही भर दिला. ङ्कवरून खालीङ्क शिकवण्याऐवजी ङ्कखालून वरङ्क ऐकण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. वंचित समाजाकडे ज्ञान नाही, समज नाही, असे गृहित धरून बोलणे हीच समस्या आहे, असे त्यांचे मत होते. प्रत्यक्षात, वंचित समाजाकडे स्वतःच्या अनुभवातून आलेले खोल ज्ञान आहे; फक्त ते ऐकण्याची तयारी समाजाने दाखवली पाहिजे.

दिशेबाबत बोलताना त्यांनी कोणतीही ठोस राजकीय घोषणा केली नाही. मात्र त्यांनी एक स्पष्ट नैतिक दिशा मांडलीङ्कवंचित समाजाला केवळ सहानुभूतीने नव्हे, तर सन्मानाने वागवण्याची दिशा. त्यांना केवळ योजनांचे लाभार्थी न ठेवता, समाजाच्या आणि देशाच्या घडणीतील भागीदार बनवण्याची दिशा. ही दिशा आकड्यांवर नाही, तर नात्यांवर, विश्वासावर आणि संवादावर उभी आहे.

एकूणच, ङ्कवंचित समाज : दशा व दिशाङ्क या कार्यक्रमातील राहुल गांधी यांचे भाषण हे राजकीय घोषणांपेक्षा सामाजिक प्रश्नांवर केंद्रित होते. दिल्लीतील विविध वृत्तपत्रांनी याची दखल घेतली कारण या भाषणात सत्ता मागणीपेक्षा समाजाला ऐकण्याची भूमिका होती. वंचित समाजाचा आवाज ऐकला गेला, त्याला प्रतिनिधित्व आणि भागीदारी मिळाली, द्वेषाऐवजी संवाद वाढला आणि लोकशाहीचा मानवी अर्थ जपला गेला, तरच समाजाची दिशा खऱ्या अर्थाने बदलू शकतेङ्कहा या भाषणाचा गाभा आहे.




# केंब्रिज कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये फ्रेशर्स पार्टीचे उत्साहात

**जनसंचलन/बुलढाणा :** स्व.रामभाऊजी लिंगाडे फाउंडेशन संचालित केंब्रिज कॉलेज ऑफ फार्मसी व केंब्रिज कॉलेज ऑफ नर्सिंग यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन शैक्षणिक वर्षातील वर्षातील बी फार्म डी फार्म व बीएससी नर्सिंग च्या नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी भव्य फ्रेशर्स पार्टी मोठ्या उत्साहात व दिमाखात पार पडली.

कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून झाली. ज्यावेळी प्राध्यापक वृंद व उपस्थित त्यांनी नव्या विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक स्वागत करत त्यांना महाविद्यालयातील संस्कृतीमूल्य आणि शैक्षणिक परंपरांची ओळख करून दिली. फ्रेशर्स पार्टीमध्ये विद्यार्थ्यांनी सादर केलेले नृत्य, समूह गायन, फॅशन शो यामुळे संपूर्ण सभागृहात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले. वरिष्ठ विद्यार्थ्यांनी नवागतांसाठी खास खेळ व मजेशीर स्पर्धांचे आयोजन केले स्पर्धकांनी आपली व्यक्तिमत्त्वाची छाप कॉन्फिडन्स व टॅलेंट यामुळे परीक्षकाचे मने जिंकली. फार्मसीतून निखिल जंजाळ व श्वेता हेलगे तर नर्सिंग मधून युवराज चव्हाण, प्रीती राठोड हे मिस्टर फ्रेशर्स व मिस फ्रेशर



पदाची मानकरी ठरले.

प्राचार्य डॉ. सुशीलकुमार शिंदे व प्राध्यापक निर्मल यांनी यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती सोबत सकारात्मक दृष्टिकोन नव्हती का मूल्य टीम वर्क आणि समाजा भूमिका जपण्याचे आव्हान केले. फ्रेशर्स पार्टी ही फक्त एक मजेशीर घटना नसून महाविद्यालयीन महाविद्यालयीन जीवनाचे सुंदर सुरुवात आहे. प्रेशर्स पार्टीचे नियोजन कॉलेजमधील विद्यार्थी कौन्सिल तसेच विभाग प्रमुख प्रा. तोफिक शेख, प्रा. अजय वाघ प्रा. सोळंकी प्रा. भारती बोकाडे मॅडम व प्रा दिपाली इंगळे यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष विधान परिषदेचे पदवीधर आमदार मा. श्री धीरजभाऊ लिंगाडे यांनी नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत करीत विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी १५ जानेवारीला मतदान व १६ जानेवारीला मतमोजणी

**मुंबई :** बृहन्मुंबईसह राज्यातील २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान तर १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी होईल. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २२७ जागांसह २ हजार ८६९ जागांसाठी ही निवडणूक होत आहे. या सर्व महानगरपालिकांच्या क्षेत्रांत आचारसंहिता लागू झाल्याची घोषणा राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी पत्रकार परिषदेत केली.

येथील सह्याद्री अतिथिगृहात महानगरपालिका निवडणुकांच्या कार्यक्रमाची घोषणा करण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत राज्य निवडणूक आयुक्त वाघमारे बोलत होते. आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यावेळी उपस्थित होते. वाघमारे यांनी सांगितले की, सर्व महानगरपालिकांची निवडणूक प्रक्रिया सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निकालाच्या आधीन राहून राबविण्यात येत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकीची अधिसूचना १६ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध होईल. उर्वरित सर्व २८ महानगरपालिकांची अधिसूचना १८ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. अधिसूचना प्रसिद्ध करण्याची प्रक्रिया संबंधित महानगरपालिका आयुक्त आपापल्या स्तरावर पार पाडतील. सर्व महानगरपालिकांसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी



सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल.

निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून संबंधित महानगरपालिका क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे. महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात ही आचारसंहिता लागू असली तरी अन्य ठिकाणीदेखील महानगरपालिकेच्या मतदारांवर प्रभाव पाडणारी घोषणा किंवा कृती करता येणार नाही. आचारसंहिता लागू झाल्यामुळे शासनाला महानगरपालिका कार्यक्षेत्राशी संबंधित धोरणात्मक निर्णय घेता येणार नाहीत. नैसर्गिक आपत्तीबाबत करावयाच्या उपाययोजना किंवा मदतीसंदर्भात आचारसंहितेची आडकाठी असणार नाही. राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आचारसंहितेचे पालन करणे आवश्यक असेल. त्याचबरोबर ४ नोव्हेंबर २०२५ रोजी कायदा व सुव्यवस्थेसंदर्भातदेखील आदेश निर्गमित केले आहेत. बृहन्मुंबई वगळता अन्य सर्व २८ महानगरपालिकांच्या निवडणुका बहुसदस्यीय पद्धतीने होत आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेत एका प्रभागातून एकच सदस्य निवडून द्यावयाचा असल्याने प्रत्येक मतदाराला केवळ एकच मत द्यावे लागेल. उर्वरित सर्व २८ महानगरपालिकांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीमुळे प्रत्येक प्रभागात साधारणत: चार जागा असतील काही महानगरपालिकांच्या काही प्रभागांत तीन अथवा पाच जागा असतील. त्यानुसार बृहन्मुंबई वगळता अन्य सर्व महानगरपालिका निवडणुकांमध्ये प्रत्येक मतदाराने किमान ३ ते ५ मते देणे अपेक्षित असेल.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी संगणकीय प्रणालीद्वारे नामनिर्देशनपत्रे व शपथपत्रे दाखल करण्याची सुविधा राज्य निवडणूक आयोगाने उपलब्ध करून दिलेली आहे; परंतु विविध राजकीय पक्ष आणि नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांतील उमेदवारांची मागणी लक्षात घेऊन महानगरपालिका निवडणुकीत पारंपरिकरीत्या ऑफलाईन पद्धतीनेच नामनिर्देशनपत्रे दाखल करता येतील.

## महानगरपालिकांची नावे

■ राज्यातील २९ महानगरपालिकांपैकी जालना आणि इचलकरंजी या २ नवनिर्मित महानगरपालिका आहेत. ५ महानगरपालिकांची मुदत २०२० मध्ये संपली आहे. सर्वाधिक १८ महानगरपालिकांची मुदत २०२२ मध्ये संपली होती; तर ४ महानगरपालिकांची मुदत २०२३ मध्ये संपली आहे. मुदत समाप्तीची महानगरपालिकानिहाय तारीख अशी: छत्रपती संभाजीनगर: २७ एप्रिल २०२०, नवी मुंबई: ०७ मे २०२०, वसई- विरार: २८ जून २०२०, कल्याण- डोंबिवली: १० नोव्हेंबर २०२०, कोल्हापूर: १५ नोव्हेंबर २०२०, नागपूर: ०४ मार्च २०२२, बृहन्मुंबई: ०७ मार्च २०२२, सोलापूर: ०७ मार्च २०२२, अमरावती: ०८ मार्च २०२२, अकोला: ०८ मार्च २०२२, नाशिक: १३ मार्च २०२२, पिंपरी- चिंचवड: १३ मार्च २०२२, पुणे: १४ मार्च २०२२, उल्हासनगर: ०४ एप्रिल २०२२, ठाणे: ०५ एप्रिल २०२२, चंद्रपूर: २९ एप्रिल २०२२, परभणी: १५ मे २०२२, लातूर: २१ मे २०२२, भिवंडी- निजामपूर: ०८ जून २०२२, मालेगाव: १३ जून २०२२, पनवेल: ९ जुलै २०२२, मीरा- भाईदर: २७ ऑगस्ट २०२२, नांदेड- वाघाळा: ३१ ऑक्टोबर २०२२, सांगली- मीरज- कुपवाड: १९ ऑगस्ट २०२३, जळगाव: १७ सप्टेंबर २०२३, अहिल्यानगर: २७ डिसेंबर २०२३, धुळे: ३० डिसेंबर २०२३, जालना: नवनिर्मित आणि इचलकरंजी: नवनिर्मित.

# त्या' ८५ जागांसाठी भाजप, 'राष्ट्रवादी'ची छुपी आघाडी..

**पुणे :** पुणे महापालिकेच्या गत निवडणुकीत (२०१७) भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेसने एकमेकांसमोर लढवलेल्या जागांपैकी ८५ जागांवर काट्याची टक्कर दिली होती. त्यातील ५० जागा या भाजपने, तर उर्वरित ३५ जागा 'राष्ट्रवादी'ने जिंकल्या होत्या.महायुती एकत्र लढली असती, तर या ८५ जागांवर एक प्रमुख उमेदवार महाविकास आघाडीला सहज मिळाला असता आणि या जागांवरील लढत अत्यंत चुरशीची होण्याची शक्यता होती. सध्याच्या परिस्थितीतही येथे भाजप विरुद्ध 'राष्ट्रवादी'ची अशी लढत झाली तरी शक्यतो विजय हा 'महायुती'चाच व्हावा, अशी रणनीती आखण्यात आल्याचे सध्या दिसते आहे.पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये भाजप आणि 'राष्ट्रवादी' यांच्यातच सर्वाधिक लढती होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. पुण्यात भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि महाविकास आघाडी यांच्यात किमान तिरंगी लढत होईल, असे स्पष्ट झाले आहे. भाजप आणि शिवसेना (एकनाथ शिंदे) यांच्यात पुणे आणि पिंपरी-चिंचवड येथे युती करण्यासंदर्भात पावले उचलण्यात येत असून, अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. ही युती होण्याची शक्यता अधिक असल्याने पुण्यात तिरंगी लढत होईल, असा दावा वरिष्ठ नेत्यांकडून करण्यात येत आहे.महापालिकेच्या गत निवडणुकीत भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसने १६२ पैकी बहुतांश जागा एकमेकांच्या विरोधात लढवल्या होत्या. त्यामध्ये ८५ जागावर या दोन्ही पक्षांमध्ये चुरशीची लढत झाली होती. त्यातील ५० जागा या भाजपने, तर उर्वरित ३५ जागा या राष्ट्रवादी काँग्रेसने



जिंकल्या होत्या. सध्याच्या प्रभागरचनेवर जुन्याच प्रभागरचनेचा वरचष्मा आहे. त्यामुळे महायुती म्हणून निवडणूक लढविल्यास या ८५ जागांवर एक प्रबळ उमेदवाराची उमेदवारी नाकारली जाणार होती. हा प्रबळ उमेदवार आयता महाविकास आघाडीला मिळणार होता. या पार्श्वभूमीवर दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ नको म्हणून पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेत महायुतीमधून राष्ट्रवादी काँग्रेसला वेगळे करण्यात आल्याची चर्चा आहे.आगामी महापालिका निवडणुकीत भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून बहुतांश ठिकाणी उमेदवार दिले जातील; तसेच आगामी निवडणुकीत एकमेकांसमोर लढत देताना एकमेकांचेच अधिकाधिक उमेदवार निवडून आणण्यावर भर दिला जाईल. ज्या ठिकाणी भाजपला पोषक वातावरण आहे, तेथे 'राष्ट्रवादी' सामंजस्याने घेईल; तसेच जेथे 'राष्ट्रवादी'ला फायदा होईल तेथे भाजप सहकार्य करील. भाजप-शिवसेनेची मतांची विभागणी न टाळता महाविकास आघाडीतील मतांमध्ये अधिकाधिक फूट पाडण्याचे राजकारण या निमित्ताने खेळले गेले आहे. निकालानंतर आवश्यकता भासल्यास सत्तेत हे तिन्ही पक्ष पुन्हा एकत्र येऊ शकतात. हिंदुत्ववादी मतांमध्ये फूट टाळण्यासाठी भाजप-सेना एकत्र येण्यावरही भर देण्यात आला आहे.

# नाशिक महापालिकेवर भगवाच फडकणार

## दादा भुसेंच्या घोषणेने युतीबाबत सस्पेन्स..

**नाशिक :** महापालिकांच्या निवडणुकांसाठी महायुती करण्याबाबत पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे अंतिम निर्णय घेतील. परंतु, पक्षप्रमुख जो निर्णय घेतील त्यानुसार पक्ष देईल तो उमेदवार आणि त्याला निवडून आणण्याची जबाबदारी ही सर्वांची असेल असे सांगत, शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी नाशिक महापालिकेवर शिवसेनेचा भगवा फडकणारच असा दावा केला आहे.राज्यातील महापालिकांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर निवडणुकांच्या संदर्भात शिवसेना पदाधिकारी, इच्छुक उमेदवार, नगरसेवक यांच्या महत्त्वाची बैठक शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात शिक्षणमंत्री दादा भुसे, शिवसेना सचिव राम रेपाळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी आमदार सुहास कांदे, किशोर दराडे, उपनेते अजय बोरस्ते, विजय करंजकर, माजी खासदार हेमंत गोडसे, संपर्कप्रमुख विकास शिंदे, सहसंपर्क प्रमुख चंद्रकांत लवटे, महानगर प्रमुख प्रविण तिदमे उपस्थित होते.या बैठकीत आगामी निवडणुकांची रणनीती, संघटनात्मक मजबूती, प्रभागनिहाय आढावा, प्रचारयंत्रणा यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीत शिवसेना, युवासेना, महिला आघाडी, अंगीकृत संघटना यांचे प्रमुख पदाधिकारी, आजी-माजी नगरसेवक, इच्छुक उमेदवार व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पक्ष संघटना अधिक बळकट करून 'घराघरात शिवसेना' हा संदेश पोहोचवण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. आगामी काळात विविध प्रभागांमध्ये बैठका, जनसंवाद कार्यक्रम व संघटनात्मक उपक्रम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला.राज्याच्या मुख्यमंत्रीपदावर



असताना एकनाथजी शिंदेनी सर्वसामान्य जनतेसाठी राबवलेल्या योजना, लाडकी बहीण योजना यामुळे विधानसभेत भरभरून यश मिळाले, तसेच यश महानगर पालिकेतदेखील मिळेल, असे शिवसेना सचिव राम रेपाळे यांनी सांगितले. महायुतीचे निर्णय हे शिवसेनेचे मुख्यनेते एकनाथ शिंदे घेतील. शिवसेना सर्व १२२ जागा लढवण्यासाठी सज्ज असल्याचे उपनेते, जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांनी सांगितले.

# शिष्यवृत्ती कुणाची कृपा, दान किंवा भीक नाही: केंद्रीय मंत्री रामदास आठवले

**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या टीआरटीआय, बार्टी, सारथीतर्फे दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीवर मर्यादा घालण्याच्या विधानाचा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी खरपूस समाचार घेतला आहे. शिष्यवृत्ती कुणाची कृपा, दान किंवा भीक नाही. ती वंचित, कष्टकरी व गुणवंत विद्यार्थ्यांचा घटनात्मक अधिकार आहे, असे ते म्हणालेत. त्यांच्या या विधानामुळे या प्रकरणाचा वाद अधिकच चिघळण्याची शक्यता आहे.

अजित पवार यांनी हिवाळी अधिवेशनात विधानसभेत बोलताना काही कुटुंबातील ४-५ जण दरमहा प्रत्येकी ४२ हजार रुपयांची फेलोशिप घेतल्याचा दावा करत पीएचडी प्रवेशावर मर्यादा घालण्याचे विधान केले होते. त्यावरून आता राज्याच्या राजकारणात संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. या पार्श्वभूमीवर रामदास आठवले यांनी अजित पवारांच्या विधानावर आश्चर्य व्यक्त करत त्यांच्यावर उपरोक्त शब्दांत टीका केली आहे.



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# लग्न करून लुटणाऱ्या टोळीचा धुडगूस; नवरदेवाच्या वडिलांचं अपहरण, एकाला जबर मारहाण करून लुटलं

**पुणे :** लग्न लावून घरातील सोनं नाणं घेऊन नवरीसह रफुचक्कर होणाऱ्या टोळीचा पर्दाफाश होणार हे लक्षात येताच या टोळीने नवरदेवाच्या आणि नवरदेवाच्या मामाच्या घरात सशस्त्र घुसून धुडगूस घातला. या टोळीने दोन्ही घरातील साहित्याची तोडफफोड केली. साहित्य कमी म्हणत चक्क नवरदेवाच्या बापाचे अपहरण केल्याचा धक्कादायक प्रकार वाशिममध्ये उघडकीस आला आहे. या प्रकरणी वाशिम पोलिसांनी नवरीसह ५ आरोपी ताब्यात घेण्यात आलं आहे. या प्रकरणी त्यांच्यावर फसवणुकीसह दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात १३ आरोपींचा सहभाग निष्पन्न झाला आहे. तर तपासाअंती आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता आहे,अशी माहिती पत्रकार परिषदेत दिली.



पोलिसांनी या प्रकरणी लुटमार करणाऱ्या टोळीचा मुख्य सूत्रधार राहुल दिलीप मस्के (३२ वर्ष) नागेवाडी (जालना) आणि सतीश विनायक जाधव (वय २९) यांना अहिल्यानगर येथून ताब्यात घेतले, तर आकाश छगन गायकवाड याला जालना येथून तर नवरी मुलगी आणि एक एजंट शांताराम कडूजी खराटे मोहजा यांना सुद्धा ताब्यात घेण्यात आले आहे.

वाशिमच्या रिसोड तालुक्यातील आसेगाव पेन येथील एका तरुणाचं लग्न जमत नसल्याने लग्न जमवून देणाऱ्या एका एजंटकडून नाशिकच्या मुली सोबत लग्न जुळवून दिलं होतं. तर ११ डिसेंबर रोजी यांचा विवाह एका मंदिरात पार पडला. लग्नाच्या दोन दिवसाने मुलीच्या माहेरच्या दोन व्यक्ती मुलीला नेण्यासाठी आसेगाव पेन येथे आले. मात्र या दोघांच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने त्यांचे विचार करतात. त्या दोघांनी तिथून पोबारा केला.

आपल्या टोळीचा पर्दाफाश होईल. त्यामुळे या टोळीने आणि रात्रीच्या सुमारास तीन गाड्यांच्या माध्यमातून सशस्त्र टोळक्यासह नवरदेवाच्या घरी पोहोचले. तिथे पोहोचून नवऱ्याची विचारपूस केली. मात्र नवरदेव आढळला नाही. त्यामुळे या टोळक्याने नवरदेवाच्या घरातील साहित्याची तोडफफोड केली. हे तोडफफोड परिसरातील नागरिकांच्या लक्षात येतात त्यांनी बाहेर येऊन पाहिले. त्यानंतर त्यांना धमकी दिली. या टोळक्याने नववधूच्या शोधात नवरदेवाच्या मामाचं घर असलेल्या वाशिम तालुक्यातील मोहजा येथे वळवला आणि तिथे पोहोचून त्यांच्या घरातील साहित्याची आणि दुचाकींची नासधूस केली.तिथेही नववधू सापडत नसल्याने या टोळक्याने थेट नवरदेवाच्या वडिलांना आसेगाव पेन येथून उचलून गाडीत टाकले आणि तिथून पोबारा केला. संपूर्ण घटनेनंतर जालनाकडे जाताना या टोळक्यातील काही जणांनी एका खासगी वाहनाला अडवून बेदम मारहाण करत पैशांची लूट केली. या घटनेनंतर वाशिम पोलिसांनी विविध ३ पथक शोधासाठी रवाना केले होते.

## चौथीतील धनश्री शाळेला निघाली, पण घरी परतलीच नाही

**जळगाव :** जळगावच्या चाळीसगावातील तरवाडे बुद्रुक येथून धक्कादायक बातमी उघडकीस आली आहे. चौथीच्या वर्गात शिकणारी चिमुकली रहस्यमयरीत्या बेपत्ता झाली आहे. सकाळी १० वाजता शाळेसाठी घरातून चिमुकली निघाली होती. मात्र, सायंकाळी चिमुकली परतलीच नाही. कुटुंबियांनी आणि ग्राम स्थांनी चिमुकलीचा शोध घेतला, मात्र ती सापडली नाही. याबाबत पोलिसांना माहिती देण्यात आली असून, सध्या पोलिसांकडून शोधमोहिम सुरू आहे.

धनश्री उमेश शिंदे असं बेपत्ता झालेल्या चिमुकलीचं नाव आहे. ही चिमुकली तरवाडे बुद्रुक येथील जिल्हा परिषद शाळेत चौथीच्या वर्गात शिकत आहे. शुक्रवारी १२ डिसेंबर रोजी चिमुकली सकाळी शाळेसाठी घरातून निघाली. मात्र, संध्याकाळी झाली तरी ती घरी परतली नाही. आई-वडील शेतातून घरी परतले. त्यानंतर चिमुकली घरी न दिसल्याने त्यांनी शाळेत चौकशी केली. शाळेत चौकशी केली असता, सायंकाळी पाच वाजेपर्यंत ती शाळेत होती, नंतर घरी निघाल्याचे शिक्षकांनी सांगितले. कुटुंबीय आणि ग्रामस्थांनी सर्वत्र शोध घेतला. ग्रामपंचायतीच्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये सायंकाळी सुमारे ४.५५ वाजता ती न्हावे रस्त्याने ग्रामपंचायत कार्यालयाजवळून जाताना दिसून आली.

मात्र त्यानंतर तिचा काहीही पत्ता लागलेला नाही. दरम्यान, गावाबाहेरील शेत रस्त्यावर धनश्रीचे दप्तर आढळून आले. दरम्यान, अज्ञात व्यक्तीने अपहरण केल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. याप्रकरणी चाळीसगाव तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, जळगाव एलसीबीसह वरिष्ठ पोलीस अधिकारी, कर्मचारी गावात ठाण मांडून असून, आजूबाजूचा परिसर आणि शेतशिवार पिंजून काढत शोधमोहीम सुरू आहे.

## मेलेला माणूस जिवंत झाला; पोलीस तपासात समोर आलं चक्रावून टाकणारं सत्य

**लातूर :** लातूरच्या औसा तालुक्यात खळबळ उडवणारी घटना घडलीय. विम्याच्या पैशासाठी एका तरुणाने मृत्यूचा बनाव केल्याची घटना घडलीय. एका कारमध्ये एका तरुणाचा जळून मृत्यू झाल्याची घटना औसा तालुक्यातील वानवाडा शिवारात घडल्याचं समोर आलं होतं. त्यानंतर पोलिसांनी केलेल्या पोलीस तपासात एक धक्कादायक सत्य समोर आलं.

गणेश चव्हाण असं आपल्या मृत्यूचा बनाव करणाऱ्या व्यक्तीचं नाव आहे. गणेशनं विम्यांचे पैसे मिळवण्यासाठी आपल्याच मृत्यूचा बनाव केला होता. मोबाईल कॉल डिटेल्स, सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणातून गणेशनं आपल्याच मृत्यूचा बनाव केला. औसा तालुक्यातील वानवाडा शिवारात कारमध्ये एकाला पोत्यात बांधून गाडीसहित जाळल्याची धक्कादायक घटना घडली



होती. या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेने तपास केला होता. त्यांच्या तपासात गणेश चव्हाण हा जिवंत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. कौटुंबिक व आर्थिक अडचणी टाळण्यासाठी तसेच एक कोटीच्या इन्शुरन्स लाभापाई स्वतः मेल्याचा खोटा प्रसंग रचल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे २४ तासाच्या आत स्वतःच्या मृत्यूचा बनाव करणाऱ्या गणेश चव्हाण याला सिंधुदुर्ग जिल्ह्यातून ताब्यात घेतलं आहे. पोलीस चौकशीत त्याने मृत्यूचा बनाव रचल्याची कबुली दिली.

## कोचिंग वर्गातच मित्राचा गळा चिरला

**पुणे :** पुण्यातल्या राजगुरूनगरमधून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. खासगी कोचिंग क्लासेसमध्ये रक्तरंजित थरार झालाय. या क्लासेसमध्ये शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याने मित्रावर चाकूहल्ला केला. शिक्षक शिकवत असताना हा भयंकर प्रकार घडला. या विद्यार्थ्याने चाकूने मित्राचा गळा चिरला. या हल्ल्यात विद्यार्थी गंभीर जखमी झाला होता त्याला उपचारासाठी तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. पण उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणाचा तपास पोलिस करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, राजगुरुनगर येथे सकाळी एका खासगी कोचिंग क्लासमध्ये ही घटना घडली. एका विद्यार्थ्याने क्लासमध्येच मित्रावर जीवघेणा



हल्ला केला. शिक्षक शिकवत असताना अचानक हा मुलगा उठला त्याने सोबत आणलेला चाकू बॅगेतून काढला आणि मित्रावर सपासप वार करू लागला. या मुलाने मित्राचा गळा चिरला. या हल्ल्यात विद्यार्थ्याचा मृत्यू झाला. पुष्कर दिलीप शिंगाडे असं हत्या करण्यात आलेल्या मुलाचे नाव होते. आरोपी आणि पुष्कर दोघेही दहावीचे विद्यार्थी आहेत. क्लास सुरू असताना ही हल्ल्याची घटना घडल्यामुळे एकच खळबळ उडाली. सर्व विद्यार्थी प्रचंड घाबरले. मित्रावर हल्ला करून आरोपी मुलगा दुचाकीवरून पळून गेला. हा हल्ला का करण्यात आला यामागचे कारण अस्पष्ट आहे. घटनेची माहिती मिळताच राजगुरूनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या मुलाला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मुलाची प्रकृती चिंताजनक होती. उपचारादरम्यान त्याने प्राण सोडले. या घटनेमुळे खासगी क्लासेसमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

## दुसऱ्या प्रेमासाठी बायकोचा खून

**कच्छ :** गुजरातच्या कच्छ जिल्ह्यातील भूज तालुक्यातील नाना वरमोरा गावातून नवरा बायकोच्या नात्याला काळीमा फासणारी घटना उघडकीस आली आहे. एका १८ वर्षीय तरूणानं आपल्याला पत्नीची हत्या करून तिचा मृतदेह त्याच्या शेतातील विहिरीत फेकून दिल्याचा आरोप आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, आरोपीचे त्याच गावातील दुसऱ्या महिलेशी अवैध संबंध होते. तो तिच्याशी लग्न करू इच्छित होता. या प्रकरणात पोलिसांनी तपास करत त्याला ताब्यात घेतलं आहे.

कुलसुम (वय वर्ष १९) असे मृत महिलेचं नाव आहे. तर, पती मोहसीन मामन असे आरोपीचे नाव आहे. शुक्रवारी रात्री कुलसुमच्या वडिलांनी जावयाविरोधात कच्छ पश्चिमच्या माधापार पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल केली होती. एफआयआरनुसार, कुलसुमचा २ वर्षांपूर्वी मोहसिनशी विवाह झाला होता.



पोलिसांनी सांगितले की, मोहसिनचे लग्नापूर्वी सुमारे ५ वर्षे त्याच गावातील दुसऱ्या महिलेसोबत अवैध संबंध होते. या कारणामुळे दोघांमध्ये सतत भांडणं होत. मोहसिन कुलसुमला त्याच्या अवैध संबंधात अडथळा मानत होता. मोहसिनने शुक्रवारी रात्री कुलसुमचा धारदार शस्त्राने गळा कापला. त्यानंतर मृतदेह पोत्यात भरून शेतातील विहिरीत फेकून दिला.


दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# विश्वचषक विजेता कर्णधार भ्रष्टाचारात अडकला, कोणत्याही क्षणी अटक होणार? श्रीलंकेत वातावरण तापलं

**चंदीगड :** १९९६ मध्ये श्रीलंकेला क्रिकेटचा वनडे विश्वचषक जिंकून देणारा माजी करणधार अर्जुन रणतुंगावर भ्रष्टाचाराचे आरोप झालेत. श्रीलंकेत त्याच्यावर अटकेची टांगती तलवार आहे. त्याला कोणत्याही क्षणी अटक होऊ शकते, असे स्थानिक प्रसारमाध्यमांनी सांगितलेय. या प्रकारानंतर श्रीलंकेच्या राजकीय अनव क्रीडा विश्वात एकच खळबळ उडाली आहे. मंत्रिपदाचा गैरवापर केल्याचा ठपका रणतुंगा यांच्यावर ठेवण्यात आलाय. रणतुंगा आणि त्यांच्या भावावर तेल खरेदी करार देण्याच्या प्रक्रियेत बदल केल्याचा आणि त्याऐवजी जास्त किमतीत स्पॉट खरेदी केल्याचा आरोप आहे.

अर्जुन रणतुंगा याने श्रीलंका सरकारमध्ये पेट्रोलियम



उद्योगमंत्री म्हणून कामकाज पाहिले होते. पण आता त्याच्यावर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप करण्यात येत आहे. भाऊ दम्मिका रणतुंगा हा घोटाळ्यात दोषी आढळलाय. अर्जुन रणतुंगा मंत्री होता, त्यावेळी दम्मिका सीलोन पेट्रोलियम कॉर्पोरेशनचा अध्यक्ष होता. दम्मिकाला पोलिसांनी १५ डिसेंबर रोजी अटक केली असून त्याला तुरुंगात पाठवण्यात आले. सध्या तो जामीनावर बाहेर आलेला आहे. श्रीलंका पोलिसांकडून त्याची कसून चौकशी करण्यात येत आहे. दम्मिका याला श्रीलंकेबाहेर जाण्यास मनाई करण्यात आली आहे.

अर्जुन रणतुंगा सध्या श्रीलंकेत नाही, तो परदेशात आहे. तो देशात परतल्यानंतर अटक करण्यात येईल, असे आयोगाने कोलंबो मॅजिस्ट्रेट असांगा बोडारागामा यांच्यासमोर सांगितले. अर्जुन यांचा मोठे भाऊ, धम्मिका रणतुंगा हे त्यावेळी सरकारी पेट्रोलियम कॉर्पोरेशनचे अध्यक्ष होते. भ्रष्टाचार प्रकरणात सोम वारी त्यांना अटक करण्यात आली आणि नंतर त्यांची जामिनावर सुटका झाल्याचेही कोर्टात सांगण्यात आले. या प्रकरणाची पुढील सुनावणी १३ मार्च रोजी होणार आहे.

कच्च्या तेलाच्या खरेदी प्रक्रियेत गैरव्यवहार केल्याप्रकरणी ६३ वर्षीय दम्मिका यांची चौकशी करण्यात येत आहे. दम्मिकांच्या हस्तक्षेपामुळे सीपीसीला ८० कोटी श्रीलंकाई रुपयांचे नुकसान झाले. अर्जुन रणतुंगा हे या प्रकरणातील दुसरे आरोपी आहेत. ते सध्या श्रीलंकेच्या बाहेर आहेत. ते मायदेशी परतल्यानंतर अटकेची कारवाई होईल, असे कार्टात सांगण्यात आले.

# जॉन सीनाने शेवटची लढाई गमावली, रिंगमधून घेतला भावनिक निरोप

**नवी दिल्ली :** डब्ल्यूडब्ल्यूईचा (WWE) दिग्गज सुपरस्टार जॉन सीनाने आपल्या प्रदीर्घ आणि ऐतिहासिक कारकिर्दीला अखेर पूर्णविराम दिला आहे. ४८ वर्षीय जॉन सीनाने शनिवारी झालेल्या अखेरच्या सामन्यात गुंथरविरुद्ध पराभव स्वीकारत तब्बल २३ वर्षांच्या रेसलिंग प्रवासाला निरोप दिला. सामना संपल्यानंतर संन्यासाच्या क्षणी सीना भावूक आणि निराश दिसत होता. अखेरच्या सामन्याची सुरुवात जॉन सीनाने जबरदस्त केली होती. त्यांनी गुंथरला आपल्या खांद्यावर उचलून रिंगध्ये आदळले, ज्यामुळे प्रेक्षकांमध्ये उत्साह संचारला. त्या क्षणी असे वाटत होते की सीना विजयासह आपल्या कारकिर्दीचा शेवट करणार. मात्र सामना जसजसा पुढे सरकला, तसतशी सीनाची पकड ढिली होत गेली आणि त्याची ताकद कमी होताना दिसू लागली.

सामन्याच्या शेवटच्या टप्प्यात गुंथरने स्लीपर लॉक लावत सीनाला पूर्णपणे निष्प्रभ केले. अखेरच्या क्षणी सीनाने हार मानल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आणि त्याला पराभव स्वीकारावा लागला. हा सामना इतका थरारक होता की संपूर्ण अरेना श्वास रोखून पाहत होती. जवळपास २० वर्षांनंतर प्रथमच जॉन सीना एखाद्या सामन्यात 'टॅप आउट' झाल्याचे पाहायला मिळाले.




जॉन सीनाचा व्यावसायिक रेसलिंगमधील प्रवास अत्यंत प्रेरणादायी ठरला आहे. २००२ मध्ये स्मॅकडाउनच्या एका एपिसोडमध्ये कर्ट एंगलविरुद्ध त्याने WWE मध्ये पदार्पण केले. सुरुवातीच्या काळात सीनाला मोठा संघर्ष करावा लागला आणि एक वेळ अशीही आली होती की त्याला कंपनीतून काढून टाकले जाऊ शकते. मात्र मेहनत, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर त्याने स्वतःला सिद्ध केले. २००४ मध्ये रेसलमेनियामध्ये पदार्पण करत सीनाने बिग शोला पराभूत करून यूएस चॅम्पियनशिप जिंकली. यानंतर त्याने मागे वळून पाहिले नाही आणि पुढील दोन दशकांमध्ये WWE रिंगमधील सर्वात मोठे आणि लोकप्रिय नाव म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली. आपल्या कारकिर्दीत जॉन सीना तब्बल १७ वेळा वर्ल्ड चॅम्पियन ठरला आहे. तो तीन वेळा वर्ल्ड हेवीवेट चॅम्पियन आणि विक्रमी १३ वेळा थथए वर्ल्ड हेवीवेट चॅम्पियन राहिला आहे. याशिवाय, त्याने चार वेळा थथए युनायटेड स्टेट्स चॅम्पियनशिप आणि पाच वेळा वर्ल्ड टॅग टीम चॅम्पियनशिपही जिंकली आहे. WWE कारकिर्दीत जॉन सीनाने एकूण २,२५९ सामने खेळले.

# CSK 'या' खेळाडूंवर उधळणार ४३.४ कोटी रुपये!

**चेन्नई :** IPL १९ वा सीजन पुढील वर्षी पार पडणार आहे. IPL २०२६ साठी मिनी ऑक्शन मंगळवार १६ डिसेंबरला पार पडणार आहे. यंदाच्या स्पर्धेत एकूण १० संघांचा सहभाग असणार असून यातील ७७ जागांसाठी ऑक्शन होणार आहे. यात फ्रेंचायझींकडे खेळाडूंना विकत घेण्यासाठी २३७.५५ कोटी रुपये आहेत. यंदाचं मिनी ऑक्शन हे अबुदाबीमध्ये होणार आहे. चेन्नई सुपरकिंग्स संघाकडे ऑक्शनमध्ये खर्च करण्यासाठी ४३.४० कोटी रुपये आहेत. तेव्हा रिपोर्ट्सनुसार सीएसके ऑक्शनमध्ये खालील ५ स्टार खेळाडूंना खरेदी करण्यासाठी जोर लावू शकते. चेन्नई सुपरकिंग्सचा मागील सीजन हा अत्यंत निराशाजनक ठरला. आयपीएल २०२५ च्या पॉईंट्स टेबलमध्ये सीएसके शेवटच्या स्थानावर राहिली. त्यानंतर ऑक्शनपूर्वी सीएसकेने रवींद्र जडेजा, मथीशा पाथिराणा, सॅम करन, डेव्हॉन कॉनवे आणि रचिन रवींद्र सारख्या वरिष्ठ खेळाडूंना रिलीज केले. चेन्नई सुपरकिंग्सला आता येत्या काळासाठी पुनर्बांधणी करायची आहे. त्यामुळे ऑक्शनमध्ये ते काही स्टार खेळाडूंना संधी देऊ शकतात.

**रीस टॉपली :** सीएसकेने श्रीलंकेचा गोलंदाज मथीशा पाथिराणाला रिलीज केले. तेव्हा त्याची जागा घेण्यासाठी सीएसके रीस टॉपली, जेराल्ड कोएत्झी यांना लक्ष करू शकतो.

**व्यंकटेश अय्यर :** सीएसकेने संजू सॅमसनला संघात घेण्यासाठी ऑलराऊंडर रवींद्र जडेजा आणि सॅम करन या दोघांना ट्रेड केलं. जडेजाची पोकळी भरून काढण्यासाठी, चेन्नई सुपर किंग्ज व्यंकटेश अय्यर किंवा मोहित शर्मा सारख्या भारतीय अष्टपैलू खेळाडूंना मागे टाकू शकते.

**लियाम लिव्हिंगस्टोन :** मधल्या फळीतील धमाकेदार फलंदाज आणि गोलंदाज तसेच उत्कृष्ट फिनिशर म्हणून इंग्लंडचा क्रिकेटर लियाम लिव्हिंगस्टोनला घेण्यासाठी संघ बोली लावू शकतो.

**रवी बिश्नोई :** एलएसजीने रिलीज केलेला लेग-स्पिनर बिश्नोई याला घेण्यासाठी संघ बोली लावू शकतो.

# अमेरिकेमध्ये ला-ग्रेंजमध्ये भव्य क्रिकेट स्टेडियमचं उद्घाटन

**वेलिंग्टन :** अमेरिकेतही आता क्रिकेटचा विकास होताना दिसतोय. याचं कारणं म्हणजे जॉर्जिया जवळील ला-ग्रेंजमध्ये 'ला-ग्रेंज क्रिकेट स्टेडियम' या अत्याधुनिक मैदानाचे अधिकृत उद्घाटन करण्यात आलं. ला-ग्रेंज क्रिकेट होल्डिंग्ज या संस्थेच्या माध्यमातून उभारलं जाणारे हे स्टेडियम २०२७ मध्ये खुले होणार आहे. यामुळे अमेरिकेत क्रिकेटसाठी कायमस्वरूपी घर ठरणार आहे आणि या प्रदेशातील खेळाची ओळख तयार होण्यास मदत होणार आहे.

आंतरराष्ट्रीय दर्जा लक्षात घेऊन बांधलेलं हे स्टेडियम ४५ एकरांवर पसरलंय. या ठिकाणी १०,००० कायम स्वरूपी सीट्स असणार आहेत. एखादा मोठा कार्यक्रम करायचा झाला तर ही क्षमता २५,००० पर्यंत वाढवता येणार आहे. हे मैदान राष्ट्रीय त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय सामने आयोजित करण्यास सक्षम असणार आहे. ज्यामुळे ला-ग्रेंज जागतिक क्रिकेट परिसंस्थेतील एक महत्त्वाचे केंद्र ठरणार आहे.

फक्त उच्चस्तरीय खेळापुरते मर्यादित न राहता, हे स्टेडियम आर्थिक केंद्रबिंदू आणि प्रादेशिक आकर्षण म्हणून विकसित केलं जातंय. पर्यटनाला चालना देणे, समुदायाचा सहभाग वाढवणे आणि वर्षभर कार्यक्रम आयोजित करणं हा उद्देश आहे. स्थानिक कार्यक्रम व सांस्कृतिक उपक्रमांसाठीही हे मैदान वापरण्यात येणार आहे.

भारताचा क्रिकेटशी असलेला खोल संबंध या विकासाला विशेष महत्त्व देतो. या भारत-अमेरिका नात्याला अधिक बळकटी देणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे प्रवीण आमरे, जे भारतीय क्रिकेटचा अनुभव आणि जागतिक दृष्टीकोन या प्रकल्पात आणत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनामुळे हे मैदान आंतरराष्ट्रीय दर्जा पूर्ण करेल आणि त्यात भारतीय स्पर्धा राहील, ज्यामुळे अमेरिकेत क्रिकेटचे जागतिक घर बनण्याचे स्टेडियमचे स्वप्न अधिक दृढ होईल.




ला-ग्रेंज क्रिकेट होल्डिंग्जचे संस्थापक, अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी केवल पटेल यांनी सांगितलं की, इला-ग्रेंज क्रिकेट स्टेडियम हे केवळ पारंपरिक मैदान नाही तर ते जागतिक दर्जाचं क्रीडा आणि मनोरंजन केंद्र आहे.

सामने आयोजित करण्यापलीकडे जाऊन, हे मैदान चाहत्यांसाठी व समाजासाठी उत्साही केंद्र ठरणार आहे. हा प्रकल्प आंतरराष्ट्रीय दर्जाचे केंद्र निर्माण करण्याच्या आमच्या बांधिलकीचं प्रतीक आहे. ला-ग्रेंज क्रिकेट होल्डिंग्जचे मुख्य धोरण अधिकारी प्रवीण आमरे म्हणाले की, इम्मी उच्चस्तरीय क्रिकेट खेळलो आणि प्रशिक्षक म्हणूनही काम केलंय. त्यामुळे आंतरराष्ट्रीय दर्जाचे मैदान उभारण्यासाठी काय आवश्यक आहे हे मला चांगली कल्पना आहे. ला-ग्रेंज क्रिकेट स्टेडियम गुणवत्ता आणि जागतिक मानकांवर विशेष लक्ष देऊन विकसित केलं जातंय. खेळपट्टीपासून खेळाडूंच्या सुविधा आणि प्रेक्षकांच्या अनुभवापर्यंत प्रत्येक बाब काळजीपूर्वक आखली जातेय. जगभरात २.५ अब्ज चाहते असलेला आणि ११० सदस्य देशांत खेळला जाणारा क्रिकेट हा खेळ जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक पाहिला जाणारा खेळ आहे. अमेरिकेतही व्यावसायिक लीग्स आणि वाढत्या सहभागामुळे त्याचा विस्तार झपाट्याने होतोय. या वाढीमध्ये ला-ग्रेंज क्रिकेट स्टेडियम महत्त्वाची भूमिका बजावणार असून, ते स्पर्धात्मक सामने आयोजित करण्याचे प्रमुख केंद्र तसंच विकासाचे केंद्र ठरणार आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# रजनीकांतच्या जेलर २ मध्ये झळकणार विद्या बालन



**पुणे :** साऊथ सुपरस्टार रजनीकांत यांचा जगभरात मोठा चाहता वर्ग आहे. ते खूप वेळेपासून 'जेलर २' चित्रपटामुळे चांगलेच चर्चेत आहे. 'जेलर २' बद्दल आता मोठी अपडेट समोर आली आहे. 'जेलर २'मध्ये आता बॉलिवूडच्या अभिनेत्रीची एन्ट्री झाली आहे. 'जेलर २'हा नेल्सन दिलीपकुमार दिग्दर्शित चित्रपट आहे. 'जेलर २' पाहण्यासाठी प्रेक्षक खूपच उत्सुक आहेत.

'जेलर २' चित्रपटात बॉलिवूड अभिनेत्री विद्या बालनची एन्ट्री झाली आहे. विद्या बालनने हा चित्रपट नुकताच साइन केला आहे. चित्रपटात अभिनेत्री मुख्य भूमिकेत झळकणार असल्याचे बोले जात आहे. अद्याप 'जेलर २' मधील विद्या बालनच्या भूमिकेचे नाव समोर आले नाही. चाहते विद्याला नव्या भूमिकेत पाहण्यासाठी आतुर आहेत. रजनीकांत यांचा बहुप्रतिक्षित 'जेलर २' सिनेमा १४ ऑगस्ट २०२६ ला रिलीज होणार असल्याचे म्हटले जात आहे. मीडिया रिपोर्टनुसार, मार्च २०२५मध्ये या चित्रपटाच्या चित्रीकरण चेन्नई येथे सुरू झाले होते. चित्रपटाचे शूटिंग लवकरच संपणार आहे. तसेच 'जेलर २'मध्ये साऊथ अभिनेते मोहनलाल आणि बॉलिवूडचे दिग्गज अभिनेते मिथुन चक्रवर्ती देखील दिसणार असल्याची चर्चा पाहायला मिळत आहे. 'जेलर २'चा पहिला भाग 'जेलर' २०२३ ला रिलीज झाला. या चित्रपटाला प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. बॉक्स ऑफिसवर सिनेमाने बंपर कमाई केली. मीडिया रिपोर्टनुसार, 'जेलर 'ने जगभरात ६०० कोटींहून अधिक कमाई केली.




## ओ.पी.नय्यर यांना मरणोत्तर मोहम्मद रफी जीवन गौरव पुरस्कार जाहीर

**मुंबई :** हिंदीमधील अजरामर गाण्यांना चाली देऊन संगीत जगतात आपले अढळ स्थान निर्माण करणा-या ज्येष्ठ संगीतकार ओ. पी. नय्यर यांना मरणोत्तर यावर्षीचा मोहम्मद रफी जीवन गौरव पुरस्कार तर सुप्रसिध्द गायिका उत्तरा केळकर यांना सन २०२५ चा मोहम्मद रफी पुरस्कार देण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे सांस्कृतिक मंत्री ॲड आशिष शेलार यांनी आज केली. यावर्षीचे मोहम्मद रफी पुरस्कार जाहीर करताना आपल्याला आनंद होतो आहे, या दोघांचेही संगीत जगतात मोठे योगदान असून त्यांचा सन्मान करण्याची संधी आम्हाला मिळाली याबद्दल मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी आनंद व्यक्त केला आहे.वांद्रे पश्चिम रंगशारदा येथे २४ डिसेंबर रोजी दरवर्षी प्रमाणे हा पुरस्कार वितरण सोहळा संध्याकाळी ६.०० वा. सुरू होणार असून मान्यवरांच्या हस्ते यावर्षी या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे.

## अक्षय खन्ना अजूनही सिंगल ; कपूर खा- नदानच्या अभिनेत्रीशी मोडलं होतं लग्न

**मुंबई :** २०२५ हे वर्ष अभिनेता अक्षय खन्नासाठी धमाकेदार ठरला. एकापाठोपाठ एक ब्लॉकबस्टर चित्रपटातून त्याने आपल्या अभिनयाचं नाणं खणखणीत वाजवलं. नुकताच त्याचा धुरंधर हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर बक्कळ कमाई करत आहे. या चित्रपटात ऋअ९ङअ या गाण्यावर त्याने २५ सेकंद नृत्य केले. या नृत्याचा छोटा भाग सध्या सोशल मीडियात व्हायरल होत आहे. दरम्यान, एकेकाळी त्याचं नाव कपूर कुटुंबातील सुंदरीशी जोडलं गेलं होतं.



खरंतर अक्षय खन्ना हा अजूनही सिंगल आहे. 'कुणाची जबाबदारी मी घेऊ शकत नाही', असं म्हणत त्याने लग्न न करण्यामागचं कारण सांगितलं. दरम्यान, त्याचं नाव अभिनेत्री करिश्मा कपूरशी जोडलं गेलं होतं. मनी कंट्रोलच्या वृत्तानुसार, अजय देवगणसोबत ब्रेकअप झाल्यानंतर करिश्माची मैत्री अक्षय खन्नासोबत झाली. मैत्रीचं रूपांतर प्रेमात झालं. रिपोर्टनुसार, करिश्मा कपूर अक्षय खन्नाच्या प्रेमात पडली.

रणधीर कपूर यांनी त्यांच्या प्रेमसंबंधाला मान्यता दिली होती. दोघांनी एकमेकांशी लग्न करावे, अशी इच्छा होती. रणधीर यांनी अक्षयचे वडील विनोद खन्ना यांच्याकडे हा प्रस्ताव ठेवला होता. रणधीर या नात्यावर खूश होते. मात्र, करिश्माची आई बबिता त्यावर नाराज होती. कारण त्यावेळी करिश्मा तिच्या कारकिर्दीच्या शिखरावर होती. परिणामी हे नातं तुटलं.

अक्षय खन्ना कधीही त्याच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल उघडपणे बोलला नाही. किंवा कधीही करिश्मा कपूरचा उल्लेख केला नाही. दरम्यान, अक्षय खन्नासोबत झालेल्या ब्रेकअपनंतर अभिनेत्रीनं बिझनेसमॅन संजय कपूरसोबत लग्नगाठ बांधली. मात्र, काही वर्षांनंतर दोघांचा घटस्फोट झाला. सध्या करिश्मा एकटी जीवन जगत आहे.




## सईनंतर अमृता खानविलकर इमरान हाश्मीसोबत झळकणार

**पुणे :** बॉलिवूडचा हिरो इमरान हाश्मी कायम कोणत्या ना कोणत्या कारणामुळे चर्चेत असतो. त्यांच्या अभिनयाचे जगभरात चाहते आहेत. इमरान हाश्मी (एीररप करीहाळ) लवकरच एका नवीन प्रोजेक्टम धून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. याची एक झलक नुकतीच पाहायला मिळाली आहे. इमरान हाश्मीच्या आगामी वेब सीरिजचे नाव 'तस्करी: द स्मगलर्स वेब' असे आहे. या वेब सीरिजमध्ये तो एका मराठमोळ्या अभिनेत्रीसोबत झळकणार आहे.

इमरान हाश्मीसोबत यापूर्वी मराठी अभिनेत्री सई ताम्हणकरने 'ग्राउंड झिरो' चित्रपटात काम केले होते. आता इमरान हाश्मीसोबत काम करणारी अभिनेत्री दुसरी-तिसरी कोणी नसून महाराष्ट्राची चंद्रा आहे. मराठमोळी अभिनेत्री अमृता खानविलकर आणि बॉलिवूड अभिनेता इमरान हाश्मी एकत्र झळकणार आहेत. २०२५ च्या शेवटी अमृता खानविलकरने चाहत्यांना मोठे सरप्राइज दिले आहेत. त्यामुळे प्रेक्षक खूपच खुश आहेत.

Taskaree वेब सीरिज नेटफ्लिक्स या ओटीटी प्लॅटफफॉर्मवर प्रदर्शित होणार आहे. यात बॉलिवूडचे अनेक मोठे कलाकार पाहायला मिळणार आहे. सीरिजमध्ये झोया अफरोज, फ्रेड्डी दारुवाला, अनुजा साठे, नंदिश सिंग संधू आणि शरद केळकर हे कलाकार झळकणार आहेत. सीरिजचा टीजर १७ डिसेंबर रोजी रिलीज होणार आहे. व्हिडीओच्या कॅप्शनमध्ये लिहिलं की, 'पकड़े गए... तस्करी की



दुनिया में आप का स्वागत है...'

Taskaree वेब सीरिजचे दिग्दर्शक नीरज पांडे आहेत. चाहते या वेब सीरिजसाठी खूपच उत्सुक आहेत. काही दिवसांपूर्वी अमृता खानविलकरने चाहत्यांना नव्या वर्षात रंगभूमीवर पदार्पण करणार असल्याचे सांगून एक छान गिफ्ट दिले होते. ती पहिल्यांदाच नाटकात काम करणार आहे. तिच्या या नाटकाचे नाव 'लग्न पंचमी' असून ती अभिनेता स्वप्नील जोशीसोबत झळकणार आहे.

# जिवंत आई ‘मृत’, मुलगा ‘फायद्यात’!

## जळगाव जामोद नगर परिषदेचा धक्कादायक कारभार उघड; बँकेने दिले १० लाख!




**जनसंचलन/जळगाव जामोद :** मी जिवंत आहेः तरीही कागदोपत्री मला मृत ठरवण्यात आलं!ङ्कही हाक आहे जळगाव जामोद येथील वृद्ध कौशल्याबाई राजपूत यांची. नगर परिषदेच्या भोंगळ, निष्काळजी आणि संशयास्पद कारभारा मुळे एका जिवंत महिलेचा मृत्यू दाखला तयार झाला आणि त्या आधारे तिच्या आयुष्याची कमाई लुटली गेली!

धक्कादायक बाब म्हणजे, कौशल्याबाईच्या मुलाने प्रेमसिंह राजपूत याने ५ ऑक्टोबर २०२३ रोजी स्वतः च्या मृत्यूची स्वयंघोषणा केल्याचा अर्ज २३ नोव्हेंबर २०२३ रोजी नगर परिषदेत दिला. त्यानंतर कोणतीही शहानिशा न करता, कोणताही तपास न करता, नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांनी कौशल्याबाईच्या मृत्यूची नोंद केली आणि थेट मृत्यू प्रमाणपत्र दिले

या बनावट मृत्यू दाखल्याच्या जोरावर आईच्या खात्यातील तब्बल १० लाख रुपयांची एफडी मोडण्यात आली. पैसे काढून घेतल्यानंतर वृद्ध आईला अक्षरशः रस्त्यावर सोडून मुलगा फरार झाला, असा गंभीर आरोप आहे.

आई जिवंत असताना तिचा मृत्यू दाखला देणारी ही यंत्रणा नेमकी कुणासाठी काम करते, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

ही माहिती मिळताच कौशल्याबाईच्या पायाखालची जमीनच सरकली. मी जिवंत आहेङ्क हे सिद्ध करण्यासाठी त्या पोलीस ठाण्याचे उंबरठे झिजवत आहेत. दोन महिन्यांपूर्वी तक्रार देऊनही अद्याप कुठलीही कारवाई झालेली नाही. ठाणेदारांनी तक्रारही घेतली नाही, असा थेट आरोप कौशल्याबाईनी केला आहे.

आज या वृद्ध महिलेपाशी जगण्यासाठी काहीच उरलेले नाही. ना पैसे, ना कुटुंबाचा आधार, ना प्रशासनाची साथ! नगर परिषदेच्या या निष्काळजीपणाला जबाबदार कोण? दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई कधी?आणि जिवंत असतानाही मृत ठरवलेल्या कौशल्याबाईला न्याय मिळणार तरी कधी?

## १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ दरम्यान व्यापक सर्वेक्षण; ८३ नवीन कुष्ठरुग्ण आढळले

**जनसंचलन/बुलढाणा :** राज्य शासनाच्या आदेशानुसार व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार बुलढाणा जिल्ह्यात कुष्ठरुग्ण शोध अभियान १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत राबविण्यात आले. या अभियानांतर्गत जिल्ह्यात ८३ नवीन कुष्ठरुग्ण आढळून आले असल्याची माहिती सहाय्यक संचालक आरोग्य सेवा यांनी दिली आहे.

या अभियानांतर्गत १,८३६ प्रशिक्षित तपासणी पथकांची नेमणूक करण्यात आली होती. या अभियान कालावधीत २ डिसेंबर २०२५ पर्यंत जिल्ह्यातील ४,८८,७८५ घरांमधील एकूण २३,३०,०७५ लोकसंख्येची शारीरिक तपासणी करण्यात आली. या सर्वेक्षणाची आरोग्य केंद्र स्तरावर ३६७ पर्यवेक्षकांमार्फत प्रभावी पाहणी करण्यात येत असून या तपासणीत जिल्ह्यात एकूण १४,००६ चट्टूयांचे (संशयित) रुग्ण आढळून आले. या सर्व रुग्णांची वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून सखोल तपासणी करण्यात आली. त्यामधून ८३ नवीन कुष्ठरुग्णांचे निदान करण्यात करून औषधोपचार सुरू करण्यात आले आहे.

या निदान झालेल्या रुग्णांना ६ महिने ते १ वर्षापर्यंत नियमित उपचार घ्यावे लागणार असल्याचे सहाय्यक संचालक डॉ. हरी



पवार यांनी सांगितले.

**चट्टूयांच्या रुग्णांची तपासणी १०० टक्के पूर्ण**

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते यांच्या मार्गदर्शनाखाली आढळलेल्या सर्व चट्टूयांच्या रुग्णांची तपासणी १०० टक्के पूर्ण करण्यात आली असून ८३ नवीन कुष्ठरुग्णांना तात्काळ उपचार सुरू करण्यात आले आहेत, अशी माहिती देण्यात आली आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा क्रीडा संकुल समितीची बैठक

**जनसंचलन/बुलढाणा :** जिल्हा क्रीडा संकुल व जिजामाता क्रीडा व व्यापारी संकुलाच्या कामांना गती देण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा क्रीडा संकुल कार्यकारी समितीची बैठक सोमवारी जिल्हाधिकारी कार्यलयात संपन्न झाली.

बैठकीला समितीचे सदस्य सचिव जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस. महानकर, पवन राठोड, जयमाला राठोड, राजेश एकडे, पोलीस विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते. या बैठकीच्या सुरुवातीला जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी यापूर्वी झालेल्या कामांचा आणि जमा खर्चाचा आढावा घेतला.

त्यानंतर नगरपरिषदचा सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा मालमत्ता कर व पाणीपट्टी कर रक्कम भरणा केला असून त्यांच कार्योत्तर मंजुरी देणे, जिजामाता क्रीडा व व्यापारी संकुल येथील क्लब हाऊस रंगरंगोटीचा खर्च अदा करण्यास मान्यता देणे, जिजामाता स्टेडीयम येथील क्लब हाउसमधील मोकळ्या जागेवर फॅब्रीकेटींगचे काम करण्यास मान्यता देणे, जिल्हा क्रीडा संकुल येथील जिम कंत्राटी पद्धतीने तात्पुरत्या स्वरुपात चालविण्यास मान्यता देणे, जिल्हा क्रीडा संकुल आणि जिजामाता क्रीडा व व्यापारी संकुल येथे पोलीस भरती, राज्य क्रीडा विकास निधीतून अर्थसहाय्य मिळण्याकरीता अनुदान मागणी प्रस्ताव सादर करणे, जिल्हा क्रीडा संकुल येथील इमारत व परिसरामध्ये आणि जिजामाता क्रीडा व व्यापारी संकुल येथे सीसीटिव्ही कॅमेर खरेदीला मान्यता देणे, बॅरीकेटींग तयार करणे, जिल्हा क्रीडा संकुल येथे खेळाडू, नागरिकांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे व रंगरंगोटी करणे आदी विषयांवर सविस्तर चर्चा केली.

# भाषणादरम्यान आ.खरात यांनी मुख्यमंत्र्यांना रोखले!

## विदर्भासाठी नेमकं काय दिलं ते सांगा; आमदार खरात यांचा सवाल

**जनसंचलन/मेहकर :** महाराष्ट्रातील औद्योगिक प्रगतीबाबत व क्रमांकाबद्दल मुख्यमंत्री महोदय मोठमोठी आकडेवारी सादर करत असतांना बुलडाणा, मेहकर व विदर्भाला काय या मुळ मुद्द्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचे लक्षात येताच आमदार सिद्धार्थ खरात विधानभवनात संतप्त झाले. मुख्यमंत्री उद्योग, गुंतवणूक आणि भविष्यातील योजनांची माहिती देत असतानाच आमदार खरात यांनी त्यांना थेट रोखत विदर्भासाठी आणि विशेषतः बुलढाणा जिल्ह्यासाठी प्रत्यक्षात काय मिळाले, याचा जाब विचारला. दोन मिनिटे सभागृहात गोंधळ निर्माण झाला असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तुम्ही पहिल्यांदा आमदार झाल्यामुळे सभागृहाची शिस्त व नियम पाळण्याबद्दल .तसेच मी विदर्भासाठी काय दिले याची मागील काळातली तुलना करायचे झाले तर तोंड दाखवायला जागा राहणार नाही अशा शब्दात त्यांनी आमदार खरात यांना सांगितले ..





याविषयी माध्यमांना प्रतिक्रिया देताना आमदार सिद्धार्थ खरात बोलले की

ङ्कमुख्यमंत्री महोदय, तुम्ही संपूर्ण महाराष्ट्रासाठी काय केलं ते सांगत आहात; पण विदर्भाला त्याचा किती फायदा झाला? माझ्या बुलढाणा जिल्ह्याला काय मिळालं? मेहकरसाठी नेमकं काय दिलं?ङ्क असे थेट प्रश्न उपस्थित करत आमदार खरात यांनी सभागृहाचे लक्ष मुळ मुद्द्यांकडे वेधले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी माहिती देण्याचे आश्वासन देत शांत राहण्याची विनंती केली, मात्र आमदार खरात यांनी आपला मुद्दा कायम ठेवला.

आमदार खरात म्हणाले की, ङ्कमाननीय मुख्यमंत्री विदर्भाचे नेतृत्व करतात, ते राज्यात गुंतवणूक आणतात, याचा आम्हालाही अभिमान आहे. मात्र ७ ऑक्टोबरला झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर ज्या घोषणा झाल्या, त्याव्यतिरिक्त या विदर्भ अधिवेशनात शेतकऱ्यांसाठी, रोजगारासाठी किंवा औद्योगिक विकासासाठी कोणतीही नवी ठोस घोषणा करण्यात आलेली नाही. त्याच जुन्या घोषणा पुन्हा सांगण्यात आल्या. भविष्यात होणारे विमानतळ, रस्ते, पायाभूत सुविधा याबाबतची आकडेवारी देण्यात आली, हे स्वागतार्ह असले तरी विदर्भातील शेतकऱ्यांचे दरडोई उत्पन्न वाढणार आहे का, येथील तरुणांना रोजगार मिळणार आहे का, मागास जिल्ह्यांचा औद्योगिक विकास होणार आहे का, हे प्रश्न अनुत्तरितच असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्राचा दरडोई उत्पन्न सुमारे तीन लाख रुपयांवर आहे, तर बुलढाणा जिल्ह्याचा दरडोई उत्पन्न अवघ्या एक लाखाच्या आसपास आहे. हा प्रचंड फरक नेमका कसा भरून काढणार?ङ्क असा सवाल करत त्यांनी नंदुरबार, धुळे, बुलढाणा यांसारख्या मागास जिल्ह्यांना औद्योगिक विकासाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्याची गरज अधोरेखित केली.

ग्रामीण भागातील पांदण रस्ते, शेतरस्ते, मूलभूत सुविधा याकडे दुर्लक्ष होत असल्याची टीका करत, मुंबई महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मुंबईकेंद्रित घोषणा केल्या जात असल्याचा आरोपही आमदार खरात यांनी केला. विदर्भात अधिवेशन घेऊन घोषण्या मात्र मुंबईसाठी करायच्या आणि विदर्भाच्या तोंडाला पाणी पुसायचं, असा प्रकार सुरू आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया त्यांनी यावेळी व्यक्त केली. विदर्भासाठी ठोस निर्णय, शेतकरी आणि युवकांच्या भवितव्यासाठी स्पष्ट धोरण आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीची गरज असल्याचे ठाम मत आमदार सिद्धार्थ खरात यांनी या अधिवेशनात मांडले.

# काही क्षणात सगळं संपलं: जवानाच्या डोळ्यांसमोर पत्नीचा दुर्दैवी अंत

## प्रशासन, वाहतूक व्यवस्था पुन्हा एकदा अपयशी!




**जनसंचलन/बुलढाणा :** सिंदखेड राजा-लोणार मार्ग पुन्हा एकदा रक्तरंजित ठरला. नागझरी नाल्याजवळ सोमवारी घडलेल्या भीषण अपघाताने संपूर्ण जिल्हा हादरून गेला असून, रस्त्यावरील बेफिकीर वाहतूक, निष्काळजी वाहनचालक आणि अपुऱ्या सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. देशाच्या संरक्षणासाठी सज्ज असलेल्या एका जवानाच्या आयुष्यातील सर्वात काळा दिवस याच रस्त्याने लिहिला.

राहेरी बुद्रुक येथील रहिवासी व भारतीय सैन्यात कार्यरत असलेले प्रमोद सुरेश गवई सुट्टीवर घरी आले होते. पत्नी सौ. कोमल गवई आणि लहान मुलासह आनंदाने सासरवाडी लोणारकडे निघाले होते. मात्र नियतीने या प्रवासाला थेट मृत्यूकडे वळवले. समोर चालणाऱ्या अज्ञात बैलगाडीला दुचाकीचा अचानक धक्का लागला. नियोजनशून्य वाहतूक, कोणतीही चेतावणी नसलेला रस्ता आणि क्षणाची चूकः पत्नी कोमल रस्त्यावर कोसळल्या आणि त्याच क्षणी जालन्याकडे जाणाऱ्या भरधाव ट्रकने त्यांना चिरडले. जवानाच्या डोळ्यांसमोर पत्नीचा जागीच मृत्यू झाला. ही केवळ दुर्घटना नाही, तर व्यवस्थेचा खून आहे! प्रमोद गवई आणि त्यांचा चिमुकला मुलगा थोडक्यात बचावले असले, तरी पत्नीच्या मृत्यूचे भयावह दृश्य आयुष्यभर त्यांच्या मनावर कोरले गेले आहे. घटनास्थळी जमलेले नागरिक हादरले, डोळ्यांत अश्रू तर मनात संताप होता. ट्रक चालक फरार झाला, हा प्रकार नेहमीचाच! दोषींना संरक्षण देणारी यंत्रणा पुन्हा उघडी पडली. किनगाव राजा पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह सिंदखेड राजा येथे पाठवला असला, तरी प्रश्न कायम आहेतङ्गहा अपघात की निष्काळजीपणाचा परिणाम? या रस्त्यावर किती बळी गेल्यावर प्रशासन जागे होणार? देशासाठी लढणाऱ्या जवानाच्या संसाराची राख रस्त्यावर उडते, ही लाजिरवाणी बाब नाही काय? या शोकांतिकेने संपूर्ण पंचक्रोशीत संतापाची लाट उसळली असून, दोषींवर कठोर कारवाई आणि या मृत्यूला जबाबदार असलेल्या यंत्रणेला जाब विचारण्याची जोरदार मागणी होत आहे.

## अमडापूरमध्ये दारू तस्करांवर मोठा घाव

### ४ लाखांहून अधिकचा मुद्देमाल जप्त, पोलीस कारवाईने खळबळ

**जनसंचलन/अमडापूर :** जिल्ह्यात अवैध दारूविक्रीविरोधात पोलीस प्रशासनाने पुन्हा एकदा कडक कारवाई करत तस्करांच्या मुसक्या आवळल्या आहेत. मा. पोलीस अधीक्षक निलेश तांबे व अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक सुनिल अंबुलकर यांच्या आदेशाने दिनांक १४ डिसेंबर २०२५ रोजी अमडापूर पोलीस ठाणे हद्दीत धडाकेबाज कारवाई करण्यात आली.

ग्राम मंगरूळ नवघरे चौफुली येथे राबविण्यात आलेल्या या कारवाईत महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५(अ)(ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे छझउ अनंता फरतळे यांनी फिर्याद दिली असून, या प्रकरणात दोन आरोपींविरोधात एक गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

कारवाईदरम्यान देशी दारूचे तब्बल २८ बॉक्स जप्त करण्यात आले असून, त्यांची किंमत १ लाख ८ हजार ६४० रुपये आहे. याशिवाय ड प्रोसो कंपनीची कार (किंमत सुमारे ३ लाख रुपये) असा एकूण ४ लाख ८ हजार ६४० रुपयांचा प्रोव्ही मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



या धडाकेबाज कारवाईत NPC अनंता फरतळे, NPC सुनिल मिसाळ, PC अमोल शेजोळ, PC गणेश वाघ व PC सतीश नाटेकर यांच्या पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली. अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांना हा स्पष्ट इशारा असून, अशा कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे संकेत पोलिसांनी दिले आहेत.

## ऑपरेशन 'सिंदूर'मधील शौर्याला मानवंदना!

### मेहकरचे आमदार सिद्धार्थ खरात यांचा रणवीर संतोष मोरे यांचा जंगी सत्कार



**जनसंचलन/मेहकर :** देशाच्या सीमांचे रक्षण करताना प्राणांची पर्वा न करता शत्रूच्या छातीत धडकी भरवणारे शौर्य आजही जिवंत आहे, याचा ज्वलंत पुरावा म्हणजे सवडद (ता. सिंदखेडराजा) येथील हवालदार संतोष भगवान मोरे. ऑपरेशन 'सिंदूर'दरम्यान दाखविलेल्या अदम्य पराक्रमाला मेहकर मतदारसंघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आमदार सिद्धार्थ खरात यांनी शाल व पुष्पगुच्छ देत सन्मानित करत वीर जवानाला मानवंदना दिली.

कुपवाडा जिल्ह्यातील तंगधार या अतिसंवेदनशील सीमारेषेवर १० मे रोजी पाकिस्तानी सैन्याच्या तोफगोळ्यांच्या भीषण माऱ्यात हवालदार संतोष मोरे यांचा उजवा हात गंभीररीत्या जखमी झाला. मात्र, रक्तबंबाळ अवस्थेतही त्यांनी माघार न घेता चौदा पाकिस्तानी सैन्य व दहशतवादी ठिकाणे उद्धवस्त करत शत्रूला करारी प्रत्युत्तर दिले. जखमांपेक्षा देश मोठा, हीच त्यांची लढाऊ मानसिकता देशाला अभिमानास्पद ठरली.

या असामान्य शौर्याची दखल घेत भारत सरकारने यंदाच्या १५ ऑगस्ट रोजी त्यांना शौर्य पुरस्कार जाहीर केला असून, येत्या १४ मार्च रोजी राष्ट्रपती महोदयांच्या हस्ते त्यांचा गौरव होणार आहे. हा केवळ एका सैनिकाचा सन्मान नसून, देशासाठी झटणाऱ्या प्रत्येक जवानाचा विजय आहे.

सत्कारप्रसंगी आमदार सिद्धार्थ खरात यांनी प्रशासनाच्या अपयशावर अप्रत्यक्ष बोट ठेवत स्पष्ट शब्दांत सांगितले, ङ्गआपण सुरक्षित आहोत कारण सीमारेषेवर संतोष मोरेसारखे रणवीर उभे आहेत. त्यांचे शौर्य हे संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी आहे.

यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)चे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. रणांगणात रक्त सांडूनही न झुकणाऱ्या या वीर जवानाच्या पराक्रमाला संपूर्ण महाराष्ट्राकडून जोरदार सलाम करण्यात येत आहे.

## कदमापूरच्या शाळेतील विद्यार्थी थेट 'गणित गुरु'



**जनसंचलन/खामगाव :** आजही अनेक शाळांमध्ये गणित म्हणजे भीती, सूत्रे म्हणजे डोकेदुखी आणि उत्तर तपासण्यासाठी गुरुजींची वाट पाहणे हीच जुनी पद्धत सुरू आहे. मात्र कदमापूर (ता. खामगाव) येथील जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळेने ही साखळी तोडली आहे. येथील उपक्रमशील शिक्षक राजेश कोगदे यांनी अवघ्या इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांना दहा ते पंधरा सेकंदात गुणाकार, भागाकार, बेरीज-वजाबाकीची स्वतः पडताळणी करण्याचे कौशल्य दिले आहे. परिणामी विद्यार्थी आता गुरुजींवर अवलंबून नाहीत ते स्वत:च 'गणित गुरु' बनले आहेत!

संगणकाच्या युगात केवळ शिकवणे नव्हे, तर शिकायला शिकवणे महत्त्वाचे असते हे तत्व प्रत्यक्षात उतरवण्याचे काम कोगदे यांनी केले आहे. पूर्वी भाजक द्व भागाकार + बाकी या पारंपरिक पडताळणीवर अडकलेले गणित, आता सोप्या आणि झटपट तंत्रांमुळे विद्यार्थ्यांसाठी खेळ झाले आहे. कितीही मोठा गुणाकार असो उत्तर बरोबर की चूक, हे विद्यार्थी क्षणात ठरवतात. हा केवळ प्रयोग नाही, तर शिक्षण पद्धतीवरचा थेट सवाल आहे. ज्या शाळांमध्ये गणित भीतीदायक आहे, त्यांनी कदमापूरकडे पाहावे! राजेश कोगदे यांनी यापूर्वीही गणित, भाषा व इंग्रजीसाठी सुलभ अध्ययन पद्धती विकसित केल्या आहेत. प्रश्न एकच अशी गुणवत्ता प्रत्येक शाळेत कधी पोहोचणार?

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८